CNR-MHYA110008122025

**नि.दि.दा.क्र. ३२/२०२५**
**रुखमाबाई पानपट्टे –वि– तुकाराम हमंद**

**<u>निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश</u>**

(दिनांक ०१.०१.२०२६ रोजी पारित)

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये वादमालमत्ता मौजे. चातारी ता. उमरखेड येथील शेत भु मापन क्रमां. ६३५ एकुण क्षेत्रफळ ०.५८आर क्षेत्रफळ, ज्याची चतुसिमा पुर्वेस प्रकाश जोशी यांचे शेत, पश्चिमेस कॅनल व विठ्ठल वानखेडे यांचे शेत, उत्तरेस प्रकाश जोशी यांचे शेत, दक्षिणेस शामराव धात्रट यांचे शेत. सदर जमीन (यापुढे या मालमत्तेस '*वाद मालमत्ता*' असे संबोधण्यात आले) यावर प्रतिवादी यांनी कसल्याही प्रकारे अडथळा करु नये म्हणुन तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याकामी अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ प्रस्तुत प्रकरणात हजर होवुन सुध्दा त्यांचे लेखी कैफीयत दाखल करण्यास असमर्थ ठरलेला आहे.

**०२**. वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, म्हणणे व अभिलेखाची पाहणी केली. वादीच्या कथनांचा व युक्तीवादांचा विचार करता खालील वादप्रश्न निर्माण होत असून त्यावरील निष्कर्ष पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| **<u>अ.क्र.</u>** | **<u>वादप्रश्न</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| ०१. | वादींनी सकृतदर्शनी केस असल्याचे त्यांनी शाबीत केले आहे काय? | **...** होकारार्थी |
| ०२. | न्यायाचा समतोल वादींच्या लाभात असल्याचे त्यांनी शाबीत केले आहे काय? | **...** होकारार्थी |
| ०३. | तुर्तातुर्त मनाईहुकुम न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार असल्याचे त्यांनी शाबीत केले आहे काय? | **...** होकारार्थी |
| ०४ | आदेश? | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>वादप्रश्न क्रमांक ०१ करीता :–</u>**

**०३**. वादींचा अर्ज हा तात्पुरत्या मनाई हुकुमाकामी असल्यामुळे प्रथमतः वादीस प्रथमदर्शनी केस (*Prima facie case*) असल्याचे वादींनी सिध्द करणे आवश्यक आहे. संपुर्ण दावाच या टप्प्याला सिध्द करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे वादीचे कथन आणि त्याअनुषंगाने कागदपत्रे व बचाव याचा उहापोह करणे आवश्यक ठरतो.

**०४**. वादीने अर्जाची भिस्त पुढील कागदपत्रांवर ठेवली. १. वाद मालमत्तेचा वर्ष १९९३–९४ च्या सातबारा उताऱ्याची प्रमाणीत प्रत, ०२. वाद मालमत्तेचा वर्ष २००३–०४ चा सातबारा उताऱ्याची प्रमाणीत प्रत, ०३. वाद मालमत्तेचा चालु वर्षाची सातबारा उताऱ्याची संगणकीय प्रत तसेच गजानन पानपट्टे यांची प्रतिज्ञा प्रत्र **नि.क्र. २६** व समाधान पानपट्टे यांचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र. २७**.

**०५**. वादीच्या कथनानुसार वाद मालमत्ता ही त्याच्या कुटुंबातील मिळकत असुन त्याच्या ताबेवहिवाटीत आहे. वाद मालमत्तेच्या सातबारा उताऱ्याचे अवलोकन केले असता सदर गट क्र. ६३५ क्षेत्रफळ ०.५८ आर मिळकतीच्या महसुल दप्तरी वादीच्या नावाची नोंद प्रथमदर्शनी दिसुन येते. सदर बाब सिध्द करण्याकरीता वादीने वाद मालमत्तेचा सन १९९३–९४ चा सातबारा उतारा दाखल केला आहे त्यावर पीकपाहणी सदरी संपुर्ण क्षेत्र वादीच्या नावे ताब्यात असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते यावरुन वादी हा वाद मालमत्तेचा कब्जेदार असल्याची बाब प्रथमदर्शनी सिध्द होते. वरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता वाद मालमत्ता ही वादीच्या कुटुंबाच्या मालकीची असुन वादीच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. प्रतिवादींनी सदर प्रकरणात वाद मालमत्ता त्याच्या ताब्यात आहे किंवा मालकीची आहे याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही व लेखी कैफीयत सुध्दा दाखल केलेली नाही.

०६. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी वादी क्र. १ हीस तिच्या शेतात कचरा वेचत असतांना प्रतिवादी तिला असे म्हणाले की, वादीच्या पतीने अर्धा एकर शेत त्यांच्या हयातीत विकण्याचा करार केला होता, अर्धा एकर शेत सोड्डुन वहिती कर अशी धमकी दिली. याचाच अर्थ असे की, प्रतिवादी वादीचा कब्जास अडथळा निर्माण करीत आहे. प्रतिवादीने त्यांची बाजु माडण्याकरीता कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादीला बेदखल करण्याची प्रतिवादीना कोणताही अधिकार नाही. प्रतिवादीने आजपर्यंत लेखी कैफीयत दाखल केली नाही या परिस्थितीत त्यांच्या विरुध्दात निष्कर्ष लक्षात घेता येते. सबब मुद्दा क्र. १ याचे उत्तर मी होकारार्थी नोंदविले आहे.

**वादप्रश्न क्रमांक ०२ करीता :–**

०७. प्रस्तुत वादप्रश्नात समाविष्ट असलेला घटक न्यायाचा समतोल (*Balance of convenience*) म्हणजे तुलनात्मक अपाय अथवा पक्षकारांची होणारी गैरसोय होय. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने आहे, हे निश्चित करण्यासाठी अंतरिम मनाई हुकुमाचा अर्ज नामंजुर केल्यास अर्जदारास किती अपाय होईल या बाबीसह सदर अर्ज मंजुर केल्यास सामनेवाल्यास किती अपाय होईल या बाबीचा देखील विचार करणे आवश्यक असते. वाद मालमत्ता यावर वादीचा कब्जावहिवाट असल्याची बाब सिध्द करण्यात वादीस यश आल्याने न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द होते. सबब, वादप्रश्न क्रमांक २ चा निष्कर्ष होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**वादप्रश्न क्रमांक ०३ करीता :–**

०८. वादप्रश्न क्रमांक ३ मध्ये समाविष्ट असलेला घटक अपरिमित नुकसान (*irreparable loss*) म्हणजे पैशाने कधीही भरुन न येणारी हानी होय. जाणीवपूर्वक पुन्हा उल्लेख करावासा वाटतो की, वाद मलमत्तेवर वादीचा ताबा असल्याने मनाई हुकुम नाकारल्यास वादीच्या हक्कांवर गदा येवुन तुलनात्मक दृष्टया जास्त अपरिमित नुकसान होण्याची शक्यता निर्माण होईल,तसेच दाव्यांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता नाकारता येत

नाही. सबब, वादप्रश्न क्रमांक ३ चा निष्कर्ष होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्रमांक ०४ करीता :–</u>**

**०९**. सकृतदर्शनी केस(*Prima facie case*) न्यायाचा समतोल (*Balance of convenience*) आणि अपरिमित नुकसान (*Irreparable loss*) या तिन्ही संज्ञा केवळ अंलकारीक भाषेचा नमुना नसून सदर तिन्ही संज्ञाना विशिष्ट महत्व आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सदर तिन्ही संज्ञा वादीच्या लाभात असल्याचे शाबीत करण्यात वादीस यश आलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर होण्याच्या योग्यतेचा आहे. त्यासाठी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| ०१. | वादीचा नि.क्र.५ लगतचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो. |
| ०२. | दाव्याचा अंतीम निकाल होईपावेतो प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वाद मालमत्तेवर वादीच्या ताबा वापर, वहिती व उपभोगास प्रतिवादी स्वतः अगर इतर कुणीही त्यांच्या मार्फत अडथळा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम प्रतिवादीं क्र. १ व २ यांच्या विरुध्द पारीत करण्यात येतो. |
| ०३. | दोन्ही पक्षांनी आदेशांची नोंद घ्यावी. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
THANEDAR SHAHABUDDIN GHOUSEMOHIUDDIN
2026.01.01 17:52:44 +0530

दिनांकः ०१/०१/२०२६ ( **एस.जी.ठाणेदार** )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उमरखेड

**दाखला**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ.फाईलमध्ये मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | : | ०१.०१.२०२६ |
| न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०१.०१.२०२६ |
| लघुलेखकाचे नाव | | बी.जी.सावते (ग्रेड - III) |
| न्यायनिर्णय अपलोड करण्याची तारीख | : | ०१.०१.२०२६ |